# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in

**परिपत्रक क्र. २८९/२०२५**

**विषय:** संशोधन लेख प्रसिद्ध करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करण्यासंदर्भात सुधारित सूचना..
**संदर्भ:** विद्यापीठ परिपत्रक क्र. १२४/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१०९१) दि. ०२/०५/२०२५

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था / प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडील कार्यरत अध्यापक व पीएच.डी. विद्यार्थ्यांकडून संशोधन लेख (Research Papers) प्रसिद्ध करताना संबंधित विभाग / महाविद्यालय / परिसंस्थेचे नाव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत मा. कुलगुरूंनी गठीत केलेल्या समितीच्या शिफारसीनुसार, सर्व महाविद्यालयीन शिक्षक व संलग्न संशोधन केंद्रातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन लेख प्रकाशित करण्यापूर्वी "Ethics Centre" कडून वाङ्मयचौर्य (Plagiarism) तपासणी अहवाल व आवश्यक मान्यता प्राप्त केल्यानंतरच संशोधन पत्रिकेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करावे.

जर संशोधन लेख "Ethics Centre" ची मान्यता न घेता प्रसिद्ध करावयाचा असेल, तर त्यामध्ये विद्यापीठाचे नाव नमूद न करता तो लेख स्वतंत्रपणे प्रसिद्ध करता येईल.

या सूचनेचा उद्देश संशोधनातील नैतिकतेचे पालन, प्रामाणिकता आणि शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन हा आहे. म्हणूनच, विद्यापीठ परिपत्रक क्र. १२४/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१०९१) दि. ०२/०५/२०२५ सुधारित समजण्यात यावे, आणि सर्व संबंधितांनी सदर सूचना तात्काळ अंमलात आणावी.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ 2846 )
दिनांक: 06/11/2025 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

| | |
|---|---|
| १. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ<br>२. मा.प्राचार्य/मा.संचालक, विद्यापीठाशी संलग्न सर्व संशोधन केंद्रे/ संस्था | आपणांस विनंती की, वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा. |